# अमरावती महानगरपालिका अमरावती

## स्वच्छता विभाग

जा.क्र.:- अमनपा/स्व.वि/683/2026 दिनांक :24/07/2026

-:सूचना:-

**विषय : अमरावती महानगरपालिका हद्दीत साथरोग नियंत्रण कार्यक्रमासाठी स्प्रे पंप खरेदीकरीता स्थानिक बाजारपेठेतील विविध व्यावसायिक/पुरवठादारांकडून दरपत्रके मागविणेबाबत.**

अमरावती महानगरपालिका हद्दीत साथरोग नियंत्रण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी स्वच्छता विभागामार्फत फवारणीचे काम करण्यात येणार असून, त्यासाठी एकूण 100 (शंभर) स्प्रे पंप खरेदी करावयाचे आहेत.

त्याअनुषंगाने अमरावती शहरातील विविध व्यावसायिक, अधिकृत विक्रेते, वितरक व पुरवठादार यांच्याकडून स्पर्धात्मक दरपत्रके (Quotation) मागविण्यात येत आहेत.

दरपत्रकामध्ये खालील बाबी नमूद करणे आवश्यक राहील –

1. स्प्रे पंपाची कंपनी, मॉडेल व उत्पादकाचे नाव.
2. स्प्रे पंपाची क्षमता (लिटरमध्ये) व संपूर्ण तांत्रिक तपशील.
3. प्रति नग दर, जीएसटीचा तपशील व जीएसटीसह एकूण दर.
4. पुरवठा करण्याचा कालावधी.
5. हमी (Warranty/Guarantee) असल्यास त्याचा तपशील.
6. आवश्यक असल्यास नमुना (Sample) उपलब्ध करून देण्याची तयारी.
7. इतर लागू अटी व शर्ती.

इच्छुक व्यावसायिकांनी आपले सीलबंद दरपत्रक आवश्यक कागदपत्रांसह दिनांक 29/07/2026 रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्वच्छता विभाग, अमरावती महानगरपालिका, अमरावती येथे सादर करावे.विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

अमरावती महानगरपालिकेस कोणतेही अथवा सर्व दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राहील. तसेच ही सूचना केवळ दरपत्रके मागविण्यासाठी असून, यामुळे कोणत्याही व्यावसायिकास खरेदी आदेश देण्याचे बंधन महानगरपालिकेवर राहणार नाही.

वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता)
महानगर पालिका, अमरावती

**प्रतिलिपी :**

1. **मा. आयुक्त, अमरावती महानगरपालिका – माहितीस्तव सविनय सादर.**
2. **मा. अतिरिक्त आयुक्त-२, अमरावती महानगरपालिका – माहितीस्तव सविनय सादर.**
3. **मा. उपायुक्त-१, अमरावती महानगरपालिका – माहितीस्तव सविनय सादर.**

Scanned with OKEN Scanner